# जिल्हा प्रशिक्षण केंद्र,रत्नागिरी

शासकिय वैद्यकिय महाविद्यालय शेजारी रत्नागिरी

ई मेल : modtt19ratnagiri@gmail.com


जा.क्र./रजिप/आवि/ 532 /२६

दि. 31-8-2026

आरोग्य सेवा

प्रति,

____________________________

____________________________

विषय:- वाहन भाडयाने घेणेसाठी (On Call Basis Hiring of Vehicles) दरपत्रक पाठविणेबाबत..

संदर्भ :- १) राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपुर यांचे कडील जा.क्र.रा.आ. कुससं/ CPHC प्रशि/कक्ष ३/५५८०-८६/२०२५ दिनांक २०.०७.२०२६

२) आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापुर यांचे कडील No.HFWTC/NHM/CPHC-Trg/4635-44/2026 Date -25/06/2026

मा.संचालक राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपुर यांचेकडील दि. १५/०५/२०२५ च्या पत्रान्वये आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत जिल्हा प्रशिक्षण केंद्र, रत्नागिरी यांचेमार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा (Comprehensive Primary Health Care - CPHC) प्रवाभीपणे राबविण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र.१ अन्वये राज्यभरातील आरोग्यवर्धिनी केंद्रामधील वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचा-यांचे प्रा.आ.केंद्रस्तरावर CPHC अंगर्तत दोन दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रम (Refresher Training) आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण प्रत्येक आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये जाऊन घेण्याचे असल्याने सदर प्रशिक्षणाकरीता प्रत्येक आरोग्यवर्धिनी केंद्रापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्याकरीता वाहनाची आवश्यकता आहे.

त्यासाठी ऑन कॉल बेसिस (As & When Required) प्रती दिन भाडेतत्वावर मारुती इरटिगा स्वरुपाचे वाहन आवश्यक आहे. सदर वाहनांचा पुरवठा करणेबाबत सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहुन आपणांकडुन दरपत्रके मागविणेत येत आहेत. सदर दरपत्रके सिलबंद लखोटयामधुन या कार्यालयास दि /०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करणेत यावे उशीरा येणारे दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | ऑनकॉल बेसिस वाहन भाडे | वाहन संख्या |
|---|---|---|---|
| १ | ऑन कॉल बेसिस (As & When Required) प्रती दिन वाहन भाडे तत्वावर मारुती इरटिगा स्वरुपाचे वाहन | प्रती दिन प्रति वाहन फिरतीसाठी इंधन, वाहन चालक, वाहन देखभाल, दुरुस्तीसह एकुण रक्कम रुपये | ०१ (एक) |

दरपत्रके ३ लिफाफा पध्दतीने द्यावीत.

अ) लखोटा क्र.०१= वाहनाची कागदपत्रे ब) लखोटा क्र.०२ = आर्थिक कागदपत्रे सोबत दरपत्रके मागणी अटी व शर्ती

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी.

प्रत सस्नेह :- मा.प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापुर.

# अटी व शर्ती

१) वाहनाच्या भाड्याचे दर करारनाम्याच्या दिनांकापासून म्हणजे दि. ०१/०८/२०२६ ते ३१/०३/२०२७ करीता मान्य राहतील. या कालावधीमध्ये दरात कोणत्याही कारणास्तव बदल होणार नाही.

२) सदर बाबी करीता सन २०२६-२७ मध्ये शासनाकडून मंजूरी व अनुदान उपलब्ध झाले तरच ऑन बेसीस सेवा सुरु ठेवली जाईल शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या आधारे सदर बाबी करीता मंजूर अनुदानापुरती सेवा मर्यादित राहील.

३) सदरील वाहनाची जानेवारी २०१९ नंतरची निर्मिती बंधनकारक आहे.

४) मोटार वाहन कायदा सन १९८८ मधील तरतुदी प्रमाणे वाहनाची सर्व प्रमाणपत्रे वैध असावीत.

५) मुंबई मोटारवाहन कायदयाप्रमाणे वाहनाच्या सर्व प्रकारच्या कराची रक्कम भरलेली असावी. व नवीन QR कोडप्रमाणे नंबर प्लेट असणे आवश्यक आहेण्

६) वाहनाचा थर्डपार्टीसह पूर्ण विमा उतरविलेला असावा.

७) वाहन पुरवठा धारकाने नियमानुसार वेळोवेळी पी.यु.सी. वैध प्रमाणपत्र सादर करावे.

८) वाहनाचा सर्व कर भरणा केला असलेबाबत व आवश्यक परवाने अद्ययावत असले बाबतची संबंधीत कागदपत्रे नेहमी वाहन चालकासोबत असणे आवश्यक आहे.

९) वाहन चालकाजवळ वाहन चालविणेसाठी प्रचलित कायदयानुसार वैध अनुज्ञप्ती असावी.

१०)कार्यालयाने मागणी केलेस वाहन चालकाच्या एकंदरीत वर्तणूक व चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन देणेची जबाबदारी वाहन मालकावर राहील.

११)वाहन पुरवठादाराने अटी व शर्तीप्रमाणे वाहन पुरविलेस किंवा त्यानंतर अन्य कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केलेस संबंधित वाहन धारकास सात दिवसांची पूर्व सूचना देवून करार रद्द करणेचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.

१२)वाहन कर्तव्यावर असताना नादुरुस्त/ खराब झाल्यास त्वरीत बदली वाहन पुरविणेची व्यवस्था वाहन पुरवठादारांनी करणेची आहे.

१३)वाहन पुरवठादाराने निर्धारित केलेल्या कर्तव्यासाठी वाहनाचा पुरवठा न केलेस मुख्य कार्यकारी अधिकारी निर्धारित करतील तो दंड अधिक वाहन बाजारातून भाड्याने घेणेत येईल त्यास दयावे लागणारे ज्यादाचे भाडे अशी एकत्रित वसूली वाहन पुरवठादाराकडून करणेत येईल.

१४)कार्यालयीयन परवानगीशिवाय वाह खाजगीरित्या वापरता येणार नाही. जर अनधिकृतपणे खाजगी प्रवास वाहतूक करणेसाठी वाहनाचा वापर केला जात आहे असे निदर्शनास आलेस सदरचा करार रद्द करणेत येईल व पुन:श्च करारापर्यतच्या कार्यवाहीचा सर्व येणारा खर्च वाहन पुरवठादार यांचेकडून वसुल करणेत येईल.

१५)वाहन वापराबाबतची दैनंदिनी अधिकृत माहिती कार्यालयीन सुचनेनुसार (उदा. दिनांक, फिरतीचे ठिकाण,वेळ,वापर,किमी इ.) नियमितपणे कार्यालयास लेखी सादर करणे अनिवार्य राहील.

१६)वाहन कर्तव्यावर असताना अपघात झाल्यास व वाहनातील प्रवाशास इजा, दुखापत, मृत्यू झालेस किंवा त्या अनुषगांने होणारा सर्व खर्च/ नुकसान भरपाई वाहन पुरवठादाराने देणे बंधनकारक राहील.

१७)वाहन भाडयाच्या देयकाच्या रक्कमेतून नियमानुसार अनुज्ञेय होणारा टीडीएस, आयकर, TDS GST इ. व त्या सर्वावरील अधिभार आहरण व संवितरण अधिकारी (Drawing & Disbursing Officer) यांचे स्तरावर वसूल केला जाईल.

१८)वाहन सुस्थितीत असलेबाबचे अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनाच्या भागांची (टायर,लुब्रिकेट,डिझेल) किंमतीत वाढ झालेस कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत/ तशी मागणीही करता येणार नाही. याबाबतचा अंतिम निर्णय मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. रत्नागिरी यांचा राहील.

१९)वाहनास संगणकीय ओडोमिटर असणे आवश्यक.आहे.

२०)प्रत्येक महिना पूर्ण झालेनंतर वाहनाची देयक अदा केली जातील.

२१)वाहन पूरवठादाराने दरकरारामध्ये नमूद व उपलब्ध करुन दिलेलेच वाहन सदर कालावधीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकाराक राहील. सामान्य परिस्थितीमध्ये अन्य बदली वाहन स्विकारले जाणार नाही.

२२)करारामध्ये उदभणाऱ्या कोणत्याही विवादास्पद मुद्यांवर अंतिम निर्णय देणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. रत्नागिरी यांचे राहतील.

२३)वाहनाची देखभाल दुरुस्ती,इंधन,वंगण इतर सर्व किरकोळ स्वरुपाची कामे व वाहन चालकाचे वेतन व भत्ते इत्यादी सर्व खर्च वाहन पुरवठादाराने देण्याचा आहे.

२४)वाहनाचा वापर ग्रामीण भागात, अतिदुर्गम, डोंगराळ भागात कच्च्या व पक्क्या रस्त्यावरही करण्यात येईल.

२५)वाहन पुरवठादाराला वाहन बंद करावयाचे झालेस त्याची एक महिना अगोदर पर्व सूचना लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे, असे न केलेस एक महिन्याचे वाहनभाडे संबंधित पुरवठादाराकडून वसूल करणेत येईल. तसेच वाहन पुरवठादाराने सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत र.रू. १००/- च्या स्टॉप पेपरवर करारा पूर्ण करुन देणेचा आहे.

वैद्यकीय अधिकारी
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, रत्नागिरी

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी